MHPU020090772022

| | |
|---|---|
| दाखल दिनांक : | २९/०९/२०२२ |
| नोंदणी दिनांक : | ०४/१०/२०२२ |
| निकाल दिनांक : | २३/०७/२०२६ |
| कालावधी : | वर्षे महिने दिवस |
| | ०३ ०९ २४ |

**<u>४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पुणे यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन न्यायाधीश श्री. दीपककुमार मो. माटा)

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८१६/२०२२</u>** **<u>निशाणी क्रं.३०</u>**

१. **अशोक बन्सीलाल लोढा,**
वय – ६६ वर्षे, धंदा – निरंक,
रा. आंबिलओढा कॉलनी, साने गुरुजीनगर,
सदाशिव पेठ, पुणे.

२. **शुभांगी विजय शेळके,**
**लग्नापुर्वीचे नाव – शुभांगी अशोक लोढा,**
वय – २८ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. पदमावती, पुणे.

३. **मयुरी राहूल भंडगे,**
**लग्नापुर्वीचे नाव – मयुरी अशोक लोढा,**
वय – २५ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. आंबिलओढा कॉलनी, साने गुरुजीनगर,
सदाशिव पेठ, पुणे. .... **अर्जदार**

**विरुध्द**

**निरंक** .... **गैरअर्जदार**

**भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ अन्वये वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेबाबत.**

---

**श्री. जी.के. पाठक, विधीज्ञ अर्जदारांकरीता.**

---

**<u>न्यायनिर्णय</u>**

(निकाल जाहीर दिनांक २३ जुलै, २०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ अन्वये वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ हे मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ ह्या मुली आहेत. मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे ह्या पुणे महानगरपालिकेच्या सेवेमध्ये होत्या. त्यांची नेमणूक आरोग्य खात्यामध्ये वारजे–कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयामध्ये कार्यरत होत्या. मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे ह्या ३०/०४/२०१७ रोजी सेवानिवृत्त झाल्या. कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांचे दि.०५/०९/२०२१ रोजी पुणे येथे निधन झाले. अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांना इतर कोणीही वारस नाही.

३. अर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांना मिळणारी पी.एफ., बोनस, ग्रॅच्युइटी, रजेचा पगार, वेतन आयोगाचा फरक व इतर देय रक्कमा इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणेः–

| **अ.क्र.** | **तपशिल** | **अंदाजे रक्कम** |
|---|---|---|
| १. | पेन्शन | ₹२,१२,११५/- |
| २ | ग्रॅच्युईटी (तोषदान) | ₹३,५२,४१२/– |
| **एकूण** | | **₹५,६४,५२७/–** |

४. सदरची एकूण रक्कम ₹५,६४,५२७/– जमा रक्कम मिळण्यासाठी अर्जदारांना वारसा प्रमाणपत्राची (Succession Certificate) आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदर अर्ज दाखल करुन वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) अर्जदार क्र.१ यांच्या नावे देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक २२/०१/२०२६ रोजी प्रकाशित झालेले दैनिक वृत्तपत्र '**प्रभात**', पुणे मध्ये जाहीर प्रगटन देऊन नोटीस काढण्यात आली. परंतू सदर जाहीर नोटीस देऊनही अर्जदारांना वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्यात येवू नये म्हणुन कोणाकडुनही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

६. सदर अर्जाच्या निकालासाठी मुद्दे निर्माण झाले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदारांनी हे सिध्द केले काय की ते वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यास पात्र आहेत? | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**निष्कर्षास कारणमिमांसा**

७. सदरहु अर्जाच्या समर्थनार्थ साक्षीदार क्र.१ – श्री. अशोक बन्सीलाल लोढा ह्यांनी स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.१७ द्वारे साक्षीपुरावा दाखल केला. तसेच अर्जाच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे दाखल केले आहेत.

| **अ.क्रं.** | **कागदपत्रांचे विवरण** | **नि.क्रं.** |
|---|---|---|
| १ | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी दिलेले पत्र क्र.४२२९ | **१२** |
| २ | कौशल्या अशोक लोढा ह्यांचे मृत्यु प्रमाणपत्र | **२०** |
| ३ | अर्जदारांचे आधारकार्ड | **२१ ते २३** |
| ४ | अर्जदार क्र.२ चे जन्म प्रमाणपत्र | **२४** |
| ५ | अर्जदार क्र.३ चे जन्म प्रमाणपत्र | **२५** |
| ६ | अर्जदार क्र.२ व ३ यांचे नाव बदल्याचे शासनाचे राजपत्र | **२६ व २७** |
| ७ | अर्जदार क्र.१ व मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांचे विवाहाचे नोंदणी प्रमाणपत्र | **२८** |

**<u>मुद्दा क्र.१ बाबत</u>** –

८. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता व साक्षीदार श्री. अशोक बन्सीलाल लोढा यांचा साक्षीपुरावा लक्षात घेता असे स्पष्ट होते की, मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे हे अर्जदार क्र.१ यांच्या पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ यांची आई होती. अर्जदारांशिवाय मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांना इतर कोणीही वारस नाही. मृत्युप्रमाणपत्र (निशाणी क्र.२०) चे अवलोकन केल्यावर कौशल्या लक्ष्मण खंडाळे हे दिनांक ०५/०९/२०२1 रोजी पुणे येथे मयत झाल्याचे स्पष्ट होते. तसेच सदर प्रकरणात जाहिर नोटीस '**प्रभात**', पुणे या वर्तमानपत्रातुन काढण्यात आली. परंतू सदर अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र देऊ नये म्हणुन कोणीही हरकत घेतलेली नाही. सर्व बाबी लक्षात घेता हे स्पष्ट होते की, अर्जदार क्र.१ ते ३ हे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. अर्जदारांनी मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांच्या नोकरीमधील पेन्शन व ग्रॅच्युएटीच्या रक्कम मिळण्यासाठी अर्जदारांना वारसा प्रमाणपत्राची (Succession Certificate) आवश्यकता आहे. अर्जदार क्र.२ व ३ यांनी अर्जदार क्र.१ च्या नावाने वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे. तरी मी माझा निष्कर्ष मुद्दा क्र.१ हा होकारार्थी नोंदवित आहे व पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांचे वारस आहेत. पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामध्ये वारजे–कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय येथे मयत – कौशल्या लक्ष्मण खंडाळे यांच्या नावाने जमा असलेली ₹५,६४,५२७/– (पाच लाख चौसष्ठ हजार पाचशे सत्तावीस रूपये) ही रक्कम मिळण्यासाठी अर्जदार वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यास हे पात्र आहेत.

३. भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे आवश्यक ते न्यायालयीन शुल्क घेऊन अर्जदार क्र.१ यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्यात यावे.

४. हा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by DEEPAKKUMAR MOHANLAL MATA
Date: 2026.07.23 19:05:07 +0530

(दीपककुमार मो. माटा)

दिनांक – २३/०७/२०२६

४ थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पुणे.

**प्रमाणपत्र**

मी याव्दारे प्रमाणित करतो की सदर पी– डी– एफ– फाईलमधील मजकुर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : श्री. अ.मो.माने, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | : श्री. दीपककुमार मो. माटा,<br>४ थे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पुणे. |
| आदेश/न्यायनिर्णयाचा दिनांक | : २३/०७/२०२६ |
| पिठासिन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : २३/०७/२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : २३/०७/२०२६ |